# BDC LIBRARY
## New Paper Clipping
## A.Y. 2023-2024

# एक हजार विद्यार्थ्यांनी साकारला भारताचा नकाशा

वार्ताहर
पाटण

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या पटांगणावर प्रशासन आणि पाटण तालुका स्वीप पथकाच्या वतीने एक हजार विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या सहाय्याने भारताचा नकाशा साकारून शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी याशनी नागराजन, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुनील गाढे, तहसीलदार अनंत गुरव, गटविकास अधिकारी गोरख शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते आकाशात मतदार जागृतीचा संदेश देणारे फुगे सोडून करण्यात आली. या मानवी साखळीसाठी पाटण व परिसरातील विद्यालय आणि महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालुक्यातील ढाणे, लोहार व इतर कलाशिक्षकांच्या प्रयत्नांनी रेखाटलेल्या नकाशावर विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करत मतदान जागृतीचा संदेश दिला.

यावेळी तहसीलदार अनंत गुरव यांनी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्वांनी लोकशाहीच्या या उत्सवामध्ये सहभागी होऊन मतदानाचा अधिकार

**मतदान जागृती...**

- पाटणमध्ये मानवी साखळीने मतदान जागृतीचा संदेश
- बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले पथनाट्य
- लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन

बजावावा, असे आवाहन केले. श्रीमती शेख यांनी सर्व उपस्थितांना मतदार प्रतिज्ञा दिली. मस्करवाडी धामणीच्या शिक्षिका रेखा कसबे तसेच विद्यार्थिनी दिव्यांका कसबे यांनी मतदार गीत सादर केले. जनजागृतीसाठी प्रभात फेरी करण्यात आली. देसाई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' पथनाट्य सादर केले. तहसीलदार अनंत गुरव, गटविकास अधिकारी गोरख शेलार, नायब तहसीलदार श्रीकांत शेंडे, तालुका कृषी अधिकारी राजाराम लोखंडे, तालुका स्वीप पथक प्रमुख राजश्री बने, सहाय्यक पथक प्रमुख अरुंधती गरुड, नगर पंचायत नोडल अधिकारी श्रेयस ढगे, गजानन जाधव, वैष्णवी पवार, नागनाथ केंगार महाविद्यालयांचे प्राचार्य, कलाशिक्षक, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक स्वीप सहाय्यक पथक प्रमुख अरुंधती गरुड, आभार नितीन घाडगे यांनी मानले.



**पाटण : येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात मानवी साखळीतून साकारलेला भारताचा नकाशा.**